कोकणसाद
www.kokansad.com

शनिवार, दि. ३ डिसेंबर २०२२

# हळबे महाविद्यालयात 'लष्कर व्यवस्थापन' विषयावर व्याख्यान

## 'एनसीसी दिना'निमित्त आयोजन

कोकणसाद वृत्तसेवा

दोडामार्ग : एनसीसी दिनाचे औचित्य साधून लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात 'लष्कर व्यवस्थापन' या विषयावर सेवानिवृत्त कॅप्टन प्रसाद गवस यांचा व्याख्यान कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. दिनांक २७ नोव्हेंबर रोजी देशभरात, शाळा, महाविद्यालयात 'एनसीसी दिन' साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय, दोडामार्ग येथे छात्र सैनिकांमध्ये देश भक्तीची प्रेरणा आणि नवचेतना निर्माण करण्यासाठी व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. या वेळी 'भारतीय सैन्य व्यवस्थापन आणि कार्य' या विषयावर कॅप्टन प्रसाद गवस यांचे व्याख्यान झाले.

भारतीय सैनिक कार्य पद्धती आणि सपूर्ण व्यवस्थापन यंत्रणा याबाबत विद्यार्थ्यांना त्यांनी माहिती दिली. तसेच छात्र सैनिकांना आपल्या कार्य नेतृत्वाची आवड आणि अभिमान असणे गरजेचे आहे, तरच तो या क्षेत्रात आपले योगदान सकारात्मक पद्धतीने देवू शकतो, असे वक्तव्य व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष सावंत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आपल्या शालेय जीवनातील 'एनसीसी'च्या आठवणीना उजाळा दिला. एनसीसी करिअरच्या दृष्टिकोनातुन किती महत्वाचे आहे? तसेच एनसीसीचे बी आणि सी प्रमाणपत्र याचे महत्व काय आहे हे छात्रसैनिकांना सांगितले. आपल्या संघटन नेतृत्वातुन देश, समाजसेवेसाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमात छात्रसैनिकांचा बी परीक्षा प्रमाणपत्र आणि रँक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तद्नंतर कार्यक्रमांतर्गत छात्र सैनिकांनी सामुहीक पद्धतीने एनसीसी गीत 'हम सब भारतीय है!' याचे गायन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लेफ्ट. प्रा. डॉ. पी. एन. ढेपे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिलीप बर्वे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. एस. एस. पाडगावकर यांनी मानले.



दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयात 'एनसीसी दिन' निमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना सेवानिवृत्त कॅप्टन प्रसाद गवस, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व अन्य.